| MHKO050016932023 | नियमित दरखास्त क्रं.३१/२०२३<br><br>मयत वजीर दौलु कांबळे तर्फे वारस<br>विरुध्द<br>मयत आनंदा गुंडा चव्हाण तर्फे वारस |
|---|---|

नि. २६ खालील आदेश

दरखास्तदार प्रस्तुत अर्जाद्वारे दावा मिळकतीमध्ये दारावर जे.डी. यांनी लावलेले कुलूप तोडून दावा मिळकतीचा कब्जा पोलीस संरक्षणाखाली दरखास्तदार यांना मिळावा अशी विनंती या अर्जाद्वारे करीत आहेत.

२. दरखास्तदार कथन करतात की, दरखास्तदार याने दावा मिळकत गट क्र. २३२ मध्ये जे.डी. यांनी केलेले अतिक्रमण काढून मिळण्यासाठी रे.क.नं.३५१/२००८ हा दावा दाखल केलेला होता. त्या दावेचे कामी मे. कोर्टानी केलेल्या हुकूमाप्रमाणे जे.डी. दावा मिळकतीमधील अतिक्रमण काढणे तयार नसल्यामुळे सदर दरखास्त दाखल केलेली आहे. दरखास्तदार याने नि. २० कडे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ३५ प्रमाणे दावा मिळकतीचा कब्जा मिळावा म्हणुन अर्ज केलेला होता. सदरचा अर्ज दि. ०१.०३.२०२४ रोजी मंजुर झाला. त्याप्रमाणे प्रत्यक्ष हुकूमाची अंमलबजावणी करण्याकरिता बेलीफ दावा मिळकतीमध्ये गेले असता जे.डी. हे दावा मिळकतीचे घरास कुलूप लावून निघून गेल्याचे दिसून आले. त्यामुळे कब्जाची कारवाई पुरी होऊ शकली नाही व संबंधित बेलीफ यांनी त्याबद्दल अहवाल मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. दरखास्तदार हे आपल्या अर्जात पुढे असे कथन करतात की, जे.डी. हे सरळपणे दावा मिळकतीचा कब्जा देणेस तयार नाहीत. त्यामुळे दावा मिळकतीस असणारे कुलूप तोडुन दावा मिळकतीचा कब्जा दरखास्तदार यांना मिळणे गरजेचे आहे. तसेच सदर करवाईमध्ये जे.डी. व तर्फे संबंधित लोकांचा आक्षेप विरोध होणेची शक्यता असलेने सदर कब्जाचेवेळी हातकणंगले येथील पोलीस अधिकारी यांना पोलीस संरक्षण देणेबाबत प्रस्तुत अर्जाद्वारे दरखास्तदार विनंती करीत आहेत. तसेच पोलीस संरक्षण करिता भरावा लागणार खर्च दरखास्तदार करणेस तयार असुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेस विनंती करीत आहेत.

४. जे.डी. यांनी सदर अर्जाखाली त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास तीव्र आक्षेप नोंदवला. त्यांचे कथनानुसार, सदरचा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही. जे.डी. यांनी दाखल केलेला विलंब माफी अर्ज क्र. ५२/२०२३ हा मा. जिल्हा न्यायालय, इचलकरंजी यांनी नामंजूर केला असू त्यावर जे.डी. योग्य ती दाद वरिष्ठ न्यायालयात मागणार आहेत. सबब, अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणास्तव सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती जे.डी. करतात.

५. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, नि. २० वर कब्जा वॉरंटबाबत दि. ०१.०३.२०२४ रोजी आदेश झाला आहे. त्याबाबत बेलीफ कब्जेपट्टी वॉरंट बजावणीकरीता गेले असता यातील जे.डी. हे दावा मिळकतीला कुलूप लावुन निघुन गेलेबाबत बेलीफ यांनी आपला अहवाल दिला आहे. जे.डी. यांनी रे.क.नं. ३५१/२००८ मधील निकालाविरुध्द जिल्हा न्यायालय, इचलकरंजी येथे नियमित दिवाणी अपील क्र. ३५/२०१५ दाखल केले असून सदर कामी झालेला विलंब माफ होणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२/२०२३ दाखल केला आहे. तथापि, सदर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२/२०२३ हा मा. जिल्हा न्यायाधीश क्र. १, इचलकरंजी यांनी दि.१२.०९.२०२५ रोजी नामंजूर केला आहे. प्रस्तुत प्रकरणात हुकूमनामा अंमलबजावणीकरीता न पाठवणेकरिता कोणताही सक्षम न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही.

६. बेलीफ यांच्या अहवालावरुन जे.डी. हे दरखास्तदार यांना सरळ कायदेशिर मार्गाने कब्जेपट्टी देतील असे दिसत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने पोलीस संरक्षणाद्वारे दरखास्तीची अंमलबजावणी करणेचा अंतीम पर्याय म्हणुन वापर करणेबाबत मार्गदर्शन वेगवेगळया न्यानिवाडात केले आहे. प्रस्तुत प्रकरणात हुकूमनाम्यास स्थगिती नाही. मा. वरिष्ठ न्यायालयात सदर दरखास्तीस स्थगिती आदेश नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात दरखास्तदार यांनी मागणी केलेप्रमाणे दावा मिळकतीचा कब्जा पोलीस संरक्षणात दरखास्तदार यांना देणे गरजेचे दिसते. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे -

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. कब्जे वॉरंट बजावणीकामी हातकणंगले पोलीस ठाणे मधील पोलीस कर्मचारी यांची मदत घेणेत यावी. दरखास्तदार यांनी आवश्यक असणारा भत्ता पोलीस ठाणेत जमा करावा.

३. बेलीफ यांना आदेशीत करणेत येते की, दावा मिळकतीचा खुला कब्जा दरखास्तदार यांना कायदेशीर प्रक्रियेचे पालन करुन पंचनामा करुन देणेत यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2025.10.15 11:04:38 +0530

इचलकरंजी
दि. १४/१०/२०२५

(ए. एम. गायकवाड)
३रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
इचलकरंजी